A



**अमृतानुभव प्रथम प्रकरणावरील**

**श्रीगुलाबरावमहाराजांची**

# ‘पांडुरंग चौसष्टी’

**आणि**

**श्रीबाबाजीमहाराज पंडितांच्या अमृतनुभव-कौमुदीतील अनुवाद**

॥ श्रीज्ञाानेश्वर माऊली समर्थ ॥

नमोऽनंताय शुद्धाय कूटस्थायात्मने नमः ।
प्रेमांबुधिविहाराय ज्ञानराजाय ते नमः ॥१॥
माधुर्यरसकल्लोलां शिवशक्तिस्वरूपिणीम् ।
अमृतानुभवार्थाय वन्दे ज्ञानेशनन्दिनीम् ॥२॥

..............

## ॥ मंगलाचरण ॥

यदक्षरमनाख्येयमानंदमयकेवलम् ।
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥१॥

अर्थ - जे अविनाशी, शब्दाने वर्णन करण्यास अशक्य, आनंदमय, अद्वैत असून जे निवृत्तिनाथ या नांवाने प्रसिद्ध आहे, त्या दैवताचा मी आश्रय करितो म्हणजे अनन्य चिंतन करितो.

गुरुरित्याख्यया लोके विद्या साक्षाद्धि शांकरी ।
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम् ॥२॥

अर्थ - या लोकात गुरु म्हणून ज्याला म्हणतात, ते गुरुरूप म्हणजे प्रत्यक्ष परमात्म्यापासून प्रगट झालेली किंवा परमेश्वरस्वरूपाचे निर्वचन करणारी किंवा अज्ञानी जीवाला अत्यंत दुःखरहित व पूर्णसुखरूप करणारी साक्षात् ब्रह्मविद्याच

B

होय. आज्ञारूपाने तिचा अखंड जयजयकार असून, श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात अशा दयाघन माऊलीला माझा अखंड नमस्कार असो.

सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ।
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ॥३॥

अर्थ - द्वैताचे मिषाने वारंवार भिन्नइव भासणारे पण एकाच सच्चिदानंदरूपाने असणारे ब्रह्म व माया किंवा शिव व शक्ति यांत कोणाच्या योगाने कोण अर्ध्यासह आहे व कोण कोणाचा अर्ध आहे व त्याचप्रमाणे त्यांचे ऐक्य केव्हा होते हे, दोघेहि पूर्ण एकरूप असल्यामुळे, कोणी जाणूं शकत नाही.

अद्वैतमात्मनस्तत्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ।
तौ वन्दे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥४॥

अर्थ - शिवशक्ति हे दोनपणाने आपले अत्यंत अद्वैतत्व परस्पर दाखवीत असतात. अशा त्या जगताच्या कारणरूप देवदेवीला त्यांच्या तात्त्विक स्वरूपाचे ज्ञान होण्याकरिता मी वंदन करतो.

मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ।
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥५॥

अर्थ - जो जगाचे मूळ, मध्य व अंत असून मूळ, मध्य व अंत या मर्यादांनी जो साकार झाला आहे आणि ज्याचे ठिकाणी मूल, मध्य व अंत हे भाव नसून शिवशक्तिस्वरूपातहि जो पूर्णच आहे अशा शंभूला नमस्कार असो.

*************

# ॥ पांडुरंग चौसष्टी ॥

**अमृतानुभव :-** ऐसा ही निरुपाधिके । जगाची जिये जनके ।
तिये वंदिली मिया मूळिके । देवोदेवी ॥१॥

अर्थ - अशी ही देवोदेवी जी जगाची मूळ कारणे आहेत व जी निरुपाधिक आहेत; त्यांना मी वंदन केले.

# A

**चौसष्टी * - ॐ नमो ज्ञानेश्वरसद्‌गुरु आई । मस्तक ठेऊनि तुमचे पायीं ।**
**तुम्ही शिकविल्याची परीक्षा लवलाही । तुम्हापुढें देते ती ऐका ॥१॥**
**ज्ञान शिव, शक्ति वृत्ति । हे निरूपाधिकचि संकेतीं ।**
**आणि जगत्कारणें निश्चिती । ते म्या वंदिली दोघे ॥२॥**

अर्थ - श्री सद्‌गुरु ज्ञानेश्वरआई, तुम्ही मला जे कांही वेदान्तज्ञान सांगितले त्याची मी आपल्या चरणावर डोके ठेवून आपल्यासमोर परीक्षा देते, ती आपण ऐकून घ्या. ज्ञान म्हणजे शिव, व शक्ति म्हणजे वृत्ति. हे दोघेहि ज्ञानदृष्टीने पाहता निरुपाधिकच आहेत. अशी दोघे जगताचे कारण आहेत. या दोघांना मी वंदन करते.

जो प्रियचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी ।
चारुस्थळी एकाहारी । एकांगाचा ॥२॥

अर्थ - जो पति तोच पत्नी झाला. ज्ञानच वृत्तिरूप होते. प्रेमाचे वेगाने आत्मस्वरूप, वृत्तिरूपाने आपल्याच ठिकाणी एकाच सत्तेवर व एकाच वस्तुत्वाने उलटते.

**चौसष्टी * - ज्ञान तेचि वृत्ति । विषयप्रेमें भासे पालथी ।**
**आणि पहातां संकेतीं । एकचि सरळ ॥३॥**

अर्थ - ज्ञान वृत्ति हे एकच आहेत. विषयांच्या प्रेमानें ती वृत्ति पालथी दिसते. संकेतदृष्टीने पाहिले असता हे ज्ञान वृत्ति एकच दिसतात.

आवडीचेनि वेगे । एकएकाते गिळिताहे अंगे ।
की द्वैताचेनि पांगे । उगळिते आहाती ॥३॥

अर्थ - ज्ञान व वृत्ति किंवा शिव व शक्ति या परस्परांचे प्रेम इतके गाढ आहे की, त्या प्रेमाचे वेगाने ते एकमेकांला गिळून दोनपणाचे अंगच उरू देत नाहीत आणि पुनः प्रेम करण्याकरिताच ते द्वैताच्या आश्रयाने परस्परांना उगळितात, म्हणजे प्रगट करितात. हेहि अन्वयाचेच बोलणे आहे. दोनपणाचा भास झाला की अन्वयानेच एकपण घ्यावे लागते.

**चौसष्टी * - हरिप्रेम अंगीं चढे । तैं दोघांचें दोनपण मोडे ।**
**आणि विश्वद्वैत भासतां गाढे । तरी दोनपण पुढती ये ॥४॥**

# B

अर्थ - सगुण श्रीहरीचे प्रेम अंतःकरणात जडले असता ज्ञानवृत्तीचा दोनपणा मुळीच भासत नाही, आणि जगताचे द्वैत भासले की दोनपण पुनः भासू लागते.

जे एकचि नव्हे एकसरे । दोघा दोनपण नाहीं पुरे ।
काय नेणो साकारे । स्वरूपे जिये ॥४॥

अर्थ - आत्मस्वरूप सदा सर्वदा अत्यंत एकरूपच असत नाही. ते ज्ञानवृत्तिरूपाने दोनपणाला येते. पण हे दोघांचे दोनपण पुरे नसते. असे हे ज्ञानवृत्ति कसे साकार होतात हे सांगता येत नाही.

**चौसष्टी * - ज्ञान वृत्ति म्हणावे दोन । तरी एकचि असे ज्ञान ।आणि**
**एक म्हणावे तरी वृत्ति ज्ञान । दोघे म्हणुनि साकार निवडता नये ॥६॥**

अर्थ - ज्ञान व वृत्ति दोन आहेत असे म्हणावे तर, ज्ञान हीच एक वस्तु आहे आणि एक म्हणावे तर वृत्ति व ज्ञान असे दोनपण भासते. दोनपणामुळे दोघेहि साकार आहेत व साकार आहेत तरी वृत्ति ज्ञान एकमेकांपासून अलग होऊ शकत नाहीत, म्हणून निराकारहि आहेत.

कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनपण मिळोनि एकी ।
नेदितीच कौतुकी । एकपण फुटो ॥५॥

अर्थ - शिव-शक्ति ह्यांना आपल्या सुखाची इतकी गोडी आहे की, ते शिवशक्तिरूपाने दोनपणास आले तरी, त्यांचे दोनपण मिळून एकपणच असते. त्यांचे दोनपणात, त्यांचे मूळचे एकपण गमतीखातर देखील फुटत नाही.

**चौसष्टी * - भक्तिसुखाची प्रीति मोठी । तेथ ज्ञान-वृत्तिरूप जगजेठी ।**
**आणि आश्चर्य शेवटी । दोनपणच नसे ॥६॥**

अर्थ - आत्मस्वरूपाला भक्तिसुखाची म्हणजे आपले सुख आपण भोगण्याची इतकी गोडी आहे की, अद्वैतपरमात्मा ज्ञान व वृत्ति या दोनपणाने नटतो पण अशा प्रकारे दोनपणाला आला तरी, या स्वप्रेमरूप भक्तिलीलेत दोनपणच राहत नाही हे आश्चर्य आहे.

हा ठावोवरी वियोग-भेडे । जे बाळ जगा एवढे ।
वियाली परी न मोडे । दोघलेपण ॥६॥

अर्थ - वियोगाचे भीतीने या शिवशक्तींच्या दोनपणावरच किंवा दोनपणाचे ठिकाणीच शक्ति, जगा एवढे बाळ व्याली. पण शिवशक्तींच्या दोनपणात बिघाड झाला नाही.

**चौसष्टी * - ऐसे एकरूप दोघे । यातुनि निघती जगे ।**

**एकचि दोहो आंगें । दिसो लागे ॥७॥**

अर्थ - एकरूप असलेल्या शिवशक्तींच्या दोनपणावरच जगाचा भास होतो. पण शिवशक्ति या दोन अंगाने एक शिवच अनुभवाला येतो.

आपुलिये आंगी संसारा । देखिलिया चराचरा ।

परी नेदितीच तिसरा । झोंक लागो ॥७॥

अर्थ - आपल्या सच्चिदानंदरूप अंगावर चराचर संसाराची उभारणी पाहिली तरी देवोदेवी, आपल्या दोघाहून निराळ्या तिसऱ्या पदार्थाचा स्पर्श होऊ देत नाहीत.

**चौसष्टी * - अवघे जग जरी पाहिले । ते आपल्यावरील ओळखिले ।**

**परी ज्ञानवृत्ति वांचोनि नाही आले । तिसरे कोणी ॥८॥**

अर्थ - संपूर्ण जगाची उभारणी देवोदवी आपल्यावरच करितात, पण संपूर्ण जग म्हणजे देवोदेवीवाचून तिसरे नाही.

जया एकसत्तेचे बैसणे । दोघा एका प्रकाशाचे लेणें ।

जे अनादि एकपणें । नांदती दोघे ॥८॥

अर्थ - ज्या शिवशक्तीला एका सत्तेचे बैसणे आहे व एकाच प्रकाशाचे दोघालाहि लेणे आहे अशी ही दोघे अनादिच एकपणाने नांदतात.

**चौसष्टी * - दोन्हीही आहेती । ज्ञान आणि वृत्ति ।**

**अनादि असती । ज्ञानरूप ॥९॥**

अर्थ - शिवशक्ति म्हणजे ज्ञानवृत्ति, दोन दिसतात तरी दोघेहि ज्ञानरूपच असल्यामुळे, ते दोघेहि अनादि एकरूपच आहेत, दोन नाहीत.

भेदु लाजोनि आवडी । एकरसीं देत बुडी ।

तो भोगणेया थांव काढी । अद्वैताचा जेथे ॥९॥

अर्थ - देवोदेवी किंवा ज्ञान व वृत्ति यांतील भेद, त्यांच्या परस्परात असलेल्या अत्यंत आवडीला पाहून लाजला व त्याने ज्ञानवृत्तींच्या परमप्रेमरूप आनंदात बुडी



मारली. तो आनंद भोगण्याकरिता भेद आनंदाचा ठाव घेण्याला गेला, पण द्वैताचा ठाव न लागता तो अद्वैताचा भोक्ता झाला.

**चौसष्टी * - प्रेमामाजी भेद गेला । तो आनंदामध्ये बुडाला ।**

**अद्वैताचा भोक्ता झाला । तोहि हारपला भक्तियोगे ॥१०॥**

अर्थ - प्रेमामध्यें भेद नाहिसा घेऊन तो आनंदात बुडाला. त्या आनंदाचा भोग घेण्याकरिता, आनंदाचा ठाव घेण्याला गेला पण अद्वैताचा भोक्ता झाला. ते भोक्तृत्वहि भक्तियोगाने नाहीसे झाले.

जेणे देवे संपूर्ण देवी । जियेविण कांही ना तो गोसावी ।

किंबहुना एकोपजीवी । एकएकांची ॥१०॥

अर्थ - ज्ञानरूप शिव व वृत्तिरूप शक्ति आहे. ज्ञानाने वृत्तीला पूर्णत्व आहे व वृत्तीवाचून ज्ञान काहीच राहत नाही. ज्ञान-वृत्ति एकएकावांचून राहतच नाहीत.

**चौसष्टी * - ज्ञानावांचोनि वृत्ति नाही । वृत्तिवांचोनि ज्ञान नाही ।**

**दोनही नसोनि पाही । एक आनंद ॥१०॥**

अर्थ - ज्ञानावांचून वृत्ति राहू शकत नाही व वृत्तिवांचून ज्ञान राहू शकत नाही, आणि एक आनंद हीच वस्तु असल्यामुळे, आनंदात दोन्ही राहत नाहीत.

कैसा मेळु आला गोडिये । दोघे न माती जगीं इये ।

की परमाणूमाजी उवायें । मांडली आहातीं ॥११॥

अर्थ - ज्ञानवृत्तिरूप शिवशक्तींच्या प्रेमाचा असा काही मेळ झाला आहे की, दोघे अलग किंवा दोनपणाने जगामध्ये मावत नाहीत. म्हणजे त्यांचे एकपण फुटतच नाही. परमाणु-परमाणूत ते भरून आहेत तरी, जगात मावू शकत नसल्यामुळे, जगाहून उर्वरितहि राहिले आहेत.

**चौसष्टी * - हा आनंद एवढा प्रगट । परमाणूंतहि दिसे स्पष्ट ।**

**जग व्यापोनिया वरिष्ठ । उरोनी राहे ॥१२॥**

अर्थ - शिव शक्तींतील प्रेमरूप आनंद इतका स्पष्ट आहे की, तो परमाणु-परमाणूत दिसून येतो. जगात विषयद्वारा जो आनंद अनुभवला जातो तो, तोच असून पुनः

## A

तो विषयरहितहि अनुभवता येतो, असा उरला आहे.

जिहीं एकएकावीण । न कीजे तृणाचेंहि निर्माण ।
जियें दोघें जिऊ प्राण । जिया दोघां ॥१२॥

अर्थ - ज्ञानवृत्तिरूप शिवशक्ति हे एकाएकावाचून स्वतंत्र एकटे गवतहि निर्माण करू शकत नाहीत; व ते एकमेकांचे जीव की प्राण आहेत म्हणजे क्षणभरसुद्धा अलग होत नाहीत.

**चौसष्टी * - ज्ञानवृत्तीवांचून । गवतहि नाही झाले निर्माण ।**
**जणुं हे जीव प्राण । एकमेकांचे ॥१३॥**

अर्थ - ज्ञानवृत्तिरूप शिवशक्तीवाचून गवतहि उत्पन्न होत नाही. कारण हे एकमेकांचे जीवप्राण असल्यामुळे कधी अलग होतच नाहीत.

घरवाते मोटकी दोघें । जैं गोसावी सेजे रिघे ।
तैं दंपतीपणे जागे । स्वामिणी जैं ॥१३॥

अर्थ - घरवाते म्हणजे सर्व चराचर सृष्टी केवळ ज्ञान वृत्ति किंवा शिव शक्ति ही दोघेच आहेत. जेव्हा ज्ञानरूप गोसावी निजतो, तेव्हा एकटी वृत्तिरूप शक्ति, दंपतीपणे म्हणजे शिवशक्ति या दोघांच्याहि रूपाने जागते.

**चौसष्टी * - विश्वरूप संसार करिते । जेव्हा ज्ञान विसरते ।**
**तै दोनपणा वृत्तीते । येत असे ॥१४॥**

अर्थ - ज्ञानरूप शिव जेव्हा विसरला जातो तेव्हा वृत्तीला दोनपणा येतो व वृत्ति विश्वरूप संसार निर्माण करिते.

या दोघामाजीं एखादे । विपाये उमजले होय निदे ।
तरी घरवाते गिळोनि नुसुधे । कांही ना करी ॥१४॥

अर्थ - या दोघांमध्ये जर कदाचित् ज्ञान स्फुरले तर संपूर्ण विश्वप्रपंच गिळून शिवशक्ति नुसते निष्क्रिय होतात.

**चौसष्टी * - जरी एखादे स्मरले ज्ञान । तरी नव्हेचि विस्मरण ।**
**मग विश्व सारे गिळोन । ज्ञानचि होय ॥१५॥**

## B

अर्थ - जर कदाचित् ज्ञानवृत्तीचे ऐक्यज्ञान झाले तर 'कधी विस्मरण होते' असे वाटत नाही व संपूर्ण विश्व गिळले जाऊन सर्व ज्ञानरूपच होऊन राहते.

दोहो आंगाची आटणी । गिवसित आहाती एकपणीं ।
झाली भेदाचिया वाहाणी । आधाधी जिये ॥१५॥

अर्थ - देवोदेवी ही आपल्या एकपणात आपल्या देवोदेवी या दोनपणाची आटणी करितात. म्हणजे दोनपणा भासूच देत नाहीत, आणि दोघे दोनपणाच्या प्रवाहात दोनपणाने अर्धे अर्धे भासतात.

**चौसष्टी * - हारपोनी ज्ञानवृत्ति । एकचि असे हरिप्रीति ।**
**विश्व असणे ही प्रतीति । केवल असे ॥१६॥**

अर्थ - एका सगुण श्रीहरीच्या प्रेमामध्ये ज्ञानवृत्तींच्या दोनपणाचा भासहि राहत नाही आणि विश्वाचे असणे केवळ अनुभवरूप होऊन जाते.

विषो एकमेकांची जिये । जिये एकमेकांची विषयीं इये ।
जिये दोघे सुखिये । जियें दोघें ॥१६॥

अर्थ - ही ज्ञानवृत्तिरूप शिवशक्ति परस्परांचे विषय आहेत व तसेच परस्परांचे विषयी आहेत. परस्परांच्या योगाने परस्पर सुखी होतात.

**चौसष्टी * - ज्ञान विषयी वृत्ति विषय । कीं वृत्ति विषयी ज्ञान विषय ।**
**हे दोन्ही असोनि स्वये । सुखचि होय ॥१७॥**

अर्थ - या दोहोत ज्ञान जाणणारे व वृत्ति जाणली जाणारी आहे किंवा वृत्ति जाणणारी व ज्ञान जाणले जाणारे आहे. हे दोन्ही असून एक अखंड सुख आहे.

स्त्रीपुरुष नामभेदें । शिवपण एकलें नांदे ।
जग सगळें अधाधें । पणे जिहीं ॥१७॥

अर्थ - शिव व शक्ति यांच्यात स्त्रीलिंगी व पुरुषलिंगी नामे एवढाच भेद आहे. कारण दोन्ही ठिकाणी एक शिव हीच वस्तु आहे. स्त्रीवाचक व पुरुषवाचक शब्दांच्या दोनपणाने संपूर्ण जग शब्दमात्रच दोनपणाने विभागले आहे.

दो दांडी एक श्रुति । दो फुली एक दृति ।

दो दिवी दीप्ति । एकचि जेवि ॥१८॥

अर्थ - ज्याप्रमाणे दोन वीण्यातून एकच नाद निघतो, दोन फुलात एक सुगंध असतो, दोन दिव्यात एकच तेज असते,

दो ओठी एक गोठी । दो डोळां एकचि दिठी ।
तेवि दोघी जिही सृष्टी । एकचि जेवि ॥१९॥

अर्थ - दोन ओठात एक शब्द असतो, दोन डोळ्यांची एकच दृष्टी असते त्याप्रमाणे या सृष्टीत देवोदेवी हीं दोघे एकरूपच आहेत.

**चौसष्टी * - दोन वीण्यांत एक नाद । दोहीं फुलांत एक सुगंध ।**
**दोहो दीपामाजी एक अभेद । प्रकाश एक ॥१८॥**
**दो ओठांत एक शब्द । दोन्ही डोळ्यांत रूप अभेद ।**
**तैसे विश्व हे प्रसिद्ध । एकचि ज्ञानवृत्तिरूप ॥१९॥**

दाऊनि दोनीपण । एकरसाचे आरोगण ।
करीत आहे मेहुण । अनादि जे ॥२०॥

अर्थ - हे देवोदेवीचे दांपत्य अनादिच आहे व आपल्या ठिकाणी असे दोनपण दाखवून परस्परांना ब्रह्मरसाचे भोजन घालते.

**चौसष्टी * - ज्ञान आणि वृत्ति । दोनपणें मात्र दिसती ।**
**परी स्वानंदप्राप्ति । एकचि असे ॥२०॥**

अर्थ - ज्ञान व वृत्ति यांचे दोनपण दिसते पण ते नुसते एका स्वानंदाच्या प्राप्तीकरिताच आहे किंवा त्यांच्या दोनपणाने होणारी स्वानंदप्राप्ति मात्र एक आहे.

जे स्वामिचिया सत्ता । विण असो नेणे पतिव्रता ।
जियेविण सर्वकर्ता । कांहीं ना जो ॥२१॥

अर्थ - देवी किंवा वृत्ति अत्यंत पतिव्रता आहे. ती ज्ञानरूप पतीवाचून क्षणभरहि राहत नाही; आणि ज्ञानरूप पतीहि तिच्यावाचून काही करू शकत नाही.

**चौसष्टी * - ज्ञानावांचून वृत्ति न राहे । वृत्तीविण ज्ञान विषय न पाहे ।**
**कर्तृत्व भोक्तृत्वहि नोहे । दोहीविण ॥२१॥**



अर्थ - वृत्ति ज्ञानाशिवाय राहतच नाही आणि वृत्तीवाचून ज्ञानाला विषय जाणता येत नाही. कर्तृत्व भोक्तृत्व हे ज्ञानवृत्तीमुळेच आहे.

जे कीं भाताराचें दिसणें । भातारु जियेचे असणें ।
नेणिजती दोघेजणें । निवडूं जिये ॥२२॥

अर्थ - जी वृत्तिरूप शक्ति आपल्या शिवरूप पतीची ज्ञानदृष्टी आहे आणि ज्ञानरूप शिव हा पति त्या शक्तीरूप पत्नीचे अस्तित्व आहे असे हे दोघे शिवशक्ति परस्पराहून निवडून अलग करता येत नाहीत.

**चौसष्टी * - ज्ञानरूपचि वृत्ति आहे । म्हणोनि वेगळी करता नोहे ।**
**आणि वृत्तिरूपचि ज्ञान आहे । म्हणोनि वेगळीक नसे ॥२२॥**

अर्थ - वृत्ति ज्ञानरूपच असल्यामुळे व ज्ञान वृत्तिरूपच असल्यामुळे, ज्ञान व वृत्ति यांना अलग करता येत नाही.

गोडी आणि गुळु । कापुर आणि परिमळु ।
निवडु जाता पांगुळु । निवाडु होय ॥२३॥

अर्थ - गुळ व गुळाची गोडी, किंवा कापूर व त्याचा सुगंध या दोघांना निवडून अलग करू म्हटले तर निवडणेच पांगळे होते किंवा निवडणारी बुद्धिच चालत नाही.

**चौसष्टी * - साखरेची गोडी । कापुराची गंध परवडी ।**
**काढिता नये वेगळी । बुद्धि पांगळी म्हणोनिया ॥२३॥**

अर्थ - साखरेपासून साखरेची गोडी किंवा कापुरापासून सुगंध हे वेगळे करता येत नाहीत. कारण निवडून वेगळी करणारी बुद्धीच तेथे चालत नाही.

समग्र दीप्ति घेतां । जेवि दीपची ये हाता ।
तेवि जियेचिया तत्वतां । शिवचि लाभे ॥२४॥

अर्थ - दिव्याचे संपूर्ण तेज घेऊ गेल्यास जसा संपूर्ण दिवाच हाती येतो, तसे शक्तीचा तत्वतः विचार केल्यास, शक्ति म्हणजे दुसरे काही नसून शिवच होय असे अनुभवाला येते.

## A

**चौसष्टी * - दिव्याचा प्रकाश अवघा उचलिता । तरी दिवाचि येतसे हाता ।**
**तैसि वृत्ति उठवितां मुरवितां । ज्ञानचि होय ॥२४॥**

अर्थ - दिव्याचा सर्व प्रकाश घेतो म्हटल्यास ज्याप्रमाणे दिवाच हाती घ्यावा लागतो, त्याप्रमाणे वृत्ति उठली असता किंवा मुरली असता ज्ञानरूप शिवाचाच अनुभव येतो.

जैसा सूर्य मिरवी प्रभा । प्रभीं सूर्यत्वाचा गाभा ।
तेवि भेद गिळीत शोभा । एकचि जे ॥२५॥

अर्थ - ज्याप्रमाणे सूर्याच्या ठिकाणीच प्रकाश असतो व प्रकाशामध्ये प्रकाशघनीभूत सूर्य राहतो, त्याप्रमाणे 'शिवशक्ति' हा दोनपणा गिळीतच शक्ति शिवाची शोभा बनते.

कां बिम्ब प्रतिबिम्बा द्योतक । प्रतिबिम्ब बिम्बा अनुमापक ।
तैसे द्वैतमिषे एक । मिरवतसे ॥२६॥

अर्थ - बिंब हे प्रतिबिंबाला प्रकाशित करणारे असते व प्रतिबिंबावरूनच बिंबाची कल्पना करता येते. या बिंब-प्रतिबिंबामुळे एक बिंबरूप मुखच जाणले जाते. त्यांचे, द्वैताचे केवळ निमित्त असून, ते द्वैत सिद्ध करीत नाही, तर अद्वैतच सिद्ध करिते.

**चौसष्टी * - बिंबचि प्रतिबिंबा प्रकाशित । प्रतिबिंबे बिंबाचें अनुमान होत ।**
**तैसे द्वैतामिषे अद्वैत । अनुभवे की ॥२५॥**

अर्थ स्पष्ट आहे.

सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाईला केला पुरुषु ।
जेणें दादुलेनि सत्ता विशेषु । शक्ति झाली ॥२७॥

अर्थ - सर्व शून्याचा निष्कर्षरूप केवळ जी सत्ता, तोच ज्या बाईलीने आपला पति केला आणि ज्या केवळ सत्तारूप नवऱ्याच्या योगाने विशेष-सत्तारूप शक्ति झाली.

**चौसष्टी * - सर्व नाहीपण गेले । ज्ञानचि वृत्तिरूप झाले ।**
**वृत्तिपणहि आले । ज्ञानानेंचि तया ॥२६॥**

## B

अर्थ - सर्व नाहीपण नाहिसे केल्यावर जे ज्ञान राहते तेच वृत्तिरूप होते व शक्तीला वृत्तिपणहि त्या ज्ञानानेच येते.

जिये प्राणेश्वरीविण । शिवीहि शिवपण ।
थारो न शके ते आपण । शिवे घडली ॥२८॥

अर्थ - ज्या प्राणेश्वरीवाचून शिवाचे ठिकाणी शिवपण येऊ शकत नाही, ती प्राणेश्वरी शिवाचीच बनली आहे.

ऐश्वर्येसि ईश्वरा । जियेचे अंग संसारा ।
आपलाहि उभारा । आपणचि जे ॥२९॥

अर्थ - सर्व ऐश्वर्यासह ईश्वरपण हे जिचा आंगपसारा आहे व जी आपणच आपली सर्व उभारणी करिते.

**चौसष्टी * - संस्कारासहित वृत्ति । विश्वरूपे विराजती ।**
**ज्ञानचि होऊनि नाना आकृति । ज्ञानरूप संचले ॥२७॥**

अर्थ - ज्ञानरूप व वृत्तिशक्ति, पूर्व संस्कारानुसार चराचर जगद्रूप होते. वृत्ति म्हणजे ज्ञानच. ते ज्ञानच नाना प्रकारच्या आकाराचे झाले म्हणजे त्याला जग म्हणायचे. बाकी वस्तुतः सर्व जग म्हणजे एक ज्ञानच सर्वत्र संचले किंवा भरून आहे.

पतीचेनि अरूपपणें । लाजोनि आंगाने मिरवणे ।
केले जगा एवढे लेणें । नामरूपाचे ॥३०॥

अर्थ - शिवरूप पतीला नामरूप रहित पाहून शक्तीला लाज वाटली व आपल्या नामरूपात्मक अंगाचे, पतीचे ठिकाणी जगा एवढे लेणे केले.

**चौसष्टी * - नामरूप ज्ञानांत नाही । परी वृत्ति आटणी होवोनि पाही ।**
**एवढे विश्व निवाई । नामरूप तेचि ॥२८॥**

अर्थ - ज्ञानाचा विचार केल्यास ज्ञानांत नामरूप राहत नाही. पण ज्ञानवृत्तीचे ऐक्य करून वृत्तीचे पृथक्पण नाहीसे केले असता, नामरूपात्मक एवढे संपूर्ण विश्व नामरूपासह ज्ञानरूपच आहे असे अनुभवाला येते.

## A

ऐक्याचाही दुकाळा । बहुपणाचा सोहळा ।
जिये सदैवाचिया लीला । दाखविला ॥३१॥

अर्थ - ज्या ज्ञानरूप शिवाचे ठिकाणी अद्वैताचाच दुष्काळ आहे तेथे वृत्तीरूप शक्तीने लीलेनेच बहुपणाचा सोहळा सुदैवाने दाखविला.

**चौसष्टी * - एक सत्य पटावरी । मिथ्या चित्रे नानापरी ।**
**काढोनि लीला प्रकारी । श्रीहरी जो ॥२९॥**

अर्थ - एक सद्ब्रह्मावर नानाप्रकारची खोटी चित्रे काढून जो श्रीहरी नाना प्रकारची लीला करितो.

आंगाचिया आटणिया । कांतु उवाया आणिया जिया ।
स्वसंकोचे प्रिया । रूढविली जेणें ॥३२॥

अर्थ - स्वतःच्या आंगाच्या आटणीने जिने आपल्या प्रियाला प्रगट केले आणि ज्या प्रिय पतीने आपला संकोच करून आपल्या प्रिय पत्नीला प्रगट केले.

**चौसष्टी * - वृत्ति आटतां ज्ञान । ज्ञान आटतां वृत्तिस्फुरण ।**
**दोघांचेहि एकपण । संकेतें कळे ॥३०॥**

अर्थ - वृत्तिरूपशक्ति आटली असता ज्ञानरूप शिव स्पष्ट प्रत्यायाला येतो व ज्ञानरूप शिवाचा संकोच झाला असता वृत्तिरूपशक्ति भासते. दोघांचेहि एकपण संकेतरूप ज्ञानदृष्टीने कळते.

जियेते पहावयाचिया लोभा । चढे द्रष्टृत्वाचिया क्षोभा ।
जियेते न देखत उभा । आंगचि सांडी ॥३३॥

अर्थ - जिला पहावे अशी प्रेमवृत्ति उत्पन्न झाली असतां, तो द्रष्टा होतो व जेव्हां तिला तो पाहत नाही तेव्हां आंगच सोडून देतो.

**चौसष्टी * - वृत्ति पाहे तेव्हां पाहणारे ज्ञान । वृत्ति न पाहे तरी न राहे ज्ञानपण ।**
**हे अनुभवाची खूण । जाणती संत ॥३१॥**

अर्थ - वृत्तीच्या साह्याने ज्ञानच जाणते व वृत्तीवाचून जाणणेही ज्ञानाला संभवत नाही. हा संतांचा अनुभव आहे.

## B

कान्तेचिया भिडा । अवलावो जगा एवढा ।
आंगविला उघडा । जियेविण ॥३४॥

अर्थ - वृत्तिरूप किंवा शक्तिरूप पत्नीच्या मुरवतीखातर किंवा प्रेमामुळे अवलावो जगा एवढा म्हणजे पति शिव हा आपल्या स्वतःच्या आंगानेच जगा एवढा झाला आणि तिच्या वाचून जो उघडा म्हणजे केवळ सन्मात्र राहतो, किंवा जगाच्या प्रत्यायावांचून राहतो.

**चौसष्टी * - वृत्तीने ज्ञान विश्व आहे । वृत्ति नसतां कांहीच नोहे ।**
**परी नाहीं तेचि आहे । वृत्तिरूपें विश्व ॥३२॥**

अर्थ - वृत्तिमुळेच ज्ञान, विश्वरूप भासते कारण वृत्ति नसली तर ते भासत नाही. आणि वृत्ति नसता जे भासत नाही तेच ज्ञानवृत्तीमुळे जगद्रूप झाले आहे.

जो हा ठावोवरी मंदरूपें । उवाईलापणेंचि हारपे ।
तो झाला जियेचिनि पडपे । विश्वरूप ॥३५॥

अर्थ - येथपर्यंत जो आत्मवस्तूचा सूक्ष्म विचार झाला, तो वस्तु प्रगट असूनच लोपली कशी आहे या संबंधी झाला. तो प्रगट असून लोपला असलेला परमात्माच, शक्तीच्या प्रेमामुळे विश्वरूप झाला.

**चौसष्टी * - येथवरी सूक्ष्म निरूपण । प्रगटचि परी लोपल्या समान ।**
**तें संकेते पूर्ण । विश्वीं विश्वचि आहे ॥३३॥**

अर्थ - येथपर्यंत वस्तूचे सूक्ष्म निरूपण झाले, त्यात वस्तु प्रगट असून लोपल्या सारखी भासते. पण संकेताने म्हणजे ज्ञानदृष्टीने विश्व विश्वात आहे असे अनुभवाला येते.

जिया जेवविला शिवु । वेद्याचे बोणें बहु ।
वाढतेनसी जेऊ- नि धाला जो ॥३६॥

अर्थ - पुष्कळ प्रकारच्या वेद्य पदार्थांच्या पक्वान्नाने भरलेले ताट वाढून शक्तीने आपल्या पतीला शिवाला जेऊ घातले व तो शिव, वाढणाऱ्या शक्तिसह पवान्नाचे भोजन करून तृप्त झाला.

# A

**चौसष्टी * - वृत्तीने ज्ञानासी विषय दिधले पुष्कळ । त्या विषयांसहित**
**वृत्ति आटली सकळ । उरले ते केवळ । ज्ञानचि एक ॥३४॥**

अर्थ - वृत्तिरूप शक्तीने ज्ञानाला, ज्ञानाने जाणले जाणारे असे पुष्कळ विषय दिले, पण हा सर्व ज्ञेय विषयांचा बहुपणा ज्ञानाने वृत्तिरूप शक्तीसह नाहीसा होऊन एक केवळ ज्ञानच उरते.

निदेलेनि भातारे । जे विये चराचरे ।
जियेचा विसवला नुरे । आंबुलेपणाहि ॥३७॥

अर्थ - अद्वैत ज्ञानरूप शिवभ्रतार निजला असता, जी वृत्तिरूप शक्ति, चराचर ब्रह्मांडाला उत्पन्न करिते आणि जिने विश्रांति घेतली असता शिवाचे पतित्वहि राहत नाही.

जंव कान्त लपो बैसे । तंव नेणिजे जिया उद्देशे ।
जिये दोघे आरसे । जिया दोघा ॥३८॥

अर्थ - जेव्हा पति शिव लपतो, तेव्हा शक्तीच्यामुळेच जाणला जात नाही. कारण शिवशक्ति हे परस्परांचे परस्परांना दाखवून देणारे आरसे आहेत.

**चौसष्टी * - वृत्ती ज्ञानाचे दर्पण । ज्ञान वृत्तिदर्पण ।**
**दोहीचे एकपण । भक्तीमार्जी ॥३५॥**

अर्थ - आरशाप्रमाणे ज्ञानरूप शिवाला दाखविणारी वृत्ति होय व वृत्तीला दाखविणारा आरसा ज्ञान होय. वृत्ति व ज्ञान यांचे अत्यंत ऐय भक्तींत होते.

जियेचेनि अंगलगे । आनंद आपणा आरोगूं लागे ।
सर्व भोक्ता परि नेघे । जियेविण काही ॥३९॥

अर्थ - जिच्या अंगसंगाने आनंदरूप पुरुष आपल्या आनंदाचे आपणासच भोजन घालतो. सर्वभोक्ता तोच असला तरी ज्या शक्तीवाचून काहीहि भोग घेऊ शकत नाही.

**चौसष्टी * - ते वृत्तिचि होय हरिप्रीति । तै आनंद मिळे आपणाप्रति ।**
**परी तो आनंदभोग वृत्ती । -वांचोनि नसे ॥३६॥**

# B

अर्थ - वृत्तिच जेव्हा हरिप्रेम होते तेव्हा आनंदालाच आनंदाचा भोग मिळतो. परंतु तो आनंदाचा भोग वृत्तीवाचून काही होऊ शकत नाही.

जें प्रियाचे अंग । जो प्रियु जियेचे चांग ।
कालवुनि दोन्ही भाग । जेविते आहाती ॥४०॥

अर्थ - जी शक्ति शिवाचे अंग आहे व जो प्रियपति शिव जिचे पूर्णत्व आहे. पण हे दोघेजण आपले दोनपण कालवून जेवतात.

**चौसष्टी * - ज्ञान तेचि वृत्ति । वृत्ति तेचि ज्ञानमिति ।**
**एकचि जाणोनि दोहीप्रति । हरिप्रेम सेविती पक्वान्न ॥३७॥**

अर्थ - ज्ञानच वृत्ति होय व वृत्तिच ज्ञान होय. यांचे अत्यंत ऐक्य आहे असे कळून आल्यावर श्रीहरीचे प्रेमरूपी पक्वान्न सेवन केले जाते.

जैसी कां समीरे सकट गति । कां सोनया सकट कान्ति ।
तैसी शिवेसी शक्ति । आघवीचि जे ॥४१॥

अर्थ - ज्याप्रमाणे गति वायुसहच असते किंवा कांति सोन्यासहच असते त्याप्रमाणे शक्ति शिवासकटच आहे, शिवाला वगळून शक्ति नाही.

**चौसष्टी * - वायुगति एक जाण । कीं पिवळेपण मिळोनि एक सुवर्ण ।**
**तैसे वृत्तिचि ज्ञान । अवघे असे ॥३८॥**

अर्थ - वायु व गति एकच आहेत किंवा पिवळेपणा व सुवर्ण दोन्ही मिळून एक सोने आहे, त्याप्रमाणे वृत्ति म्हणजे अवघे ज्ञानच होय.

कां कस्तुरी सकट परिमळु । कां उष्मे सकट अनळु ।
तैसा शक्तीसी केवळु । शिवुचि जो ॥४२॥

अर्थ - सुगंध हा, कस्तुरीसहितच असतो, अग्नि हा, उष्णतेसहच असतो. त्याप्रमाणे शक्ति म्हणजे केवळ शिवच आहे.

**चौसष्टी * - अग्निसहित उष्णता । कां सुगंधासहित कर्पूरता ।**
**तैसी वृत्तिसत्ता । तत्वतां ज्ञान ॥३९॥**

अर्थ - ज्याप्रमाणे उष्णतेसहितच अग्नि असतो, किवा सुगंधासहितच कापूर असतो

त्याप्रमाणे वृत्तीची सत्ता असणे हे ज्ञानच आहे.

राती आणि दिवो । पातली सूर्याचा ठावो ।
तैसी आपुला साची वावो । जिये दोघे ॥४३॥

अर्थ - रात्र आणि दिवस, सूर्याच्या ठिकाणी ज्याप्रमाणे नाहीत म्हणजे त्यांचे दोनपण राहत नाही, दोन्ही सूर्यस्वरूपच होऊन जातात, त्याप्रमाणे शिवशक्ति दोन्ही ज्ञानरूप असल्यामुळे, त्यांचे तसे अद्वैतज्ञान झाल्यावर दोनपण खोटेच होते.

**चौसष्टी * - रात्री आणि दिवस । दोहोंचा सूर्यास नाही भास ।**
**तैसे भतीमाजीं ज्ञानवृत्तीस । पृथकत्व नसे ॥४०॥**

अर्थ - रात्र व दिवस यांचे सूर्यास ज्ञान नाही, त्याप्रमाणे भक्तीमध्ये ज्ञानवृत्ति ह्या एक होऊन जातात.

किंबहुना तिये । प्रणवाक्षरी विरूढतिये ।
दशेचीहि वैरिये । शिवशक्ति ॥४४॥

अर्थ - किंबहूना, प्रणवांतील अ, उ, म या अक्षरांच्या द्वारा बहुरूप होणारी शिवशक्ति दशेची वैरी आहेत म्हणजे शिवशक्ति व जगत् यांचा कार्यकारणभावहि नाही.

**चौसष्टी * - किंबहुना वेदाचा पिता । जो ॐ कार तो हेचि तत्वता ।**
**वृत्तिपृथकत्वे असतां । विरुद्ध वाटती ॥४१॥**

अर्थ - किंबहुना ज्या ॐ कारापासून वेद निर्माण झाले, तो ॐ कार देखील शिवशक्तिच आहे. ज्ञानापासून वृत्ति निराळी वाटली की, शिवशक्ति विरूद्ध किंवा भिन्न वाटतात.

हे असो नामरूपांचा भेद शिरा । गिळित एकार्थाचा उजिरा ।
नमो तया शिव बोहरा । ज्ञानदेवो म्हणे ॥४५॥

अर्थ - श्रीज्ञानेश्वरमाउली म्हणते, जे हे शिवशक्ति आपले ऐक्यज्ञान प्रकाशित करून नामरूपांचा भेदरूपी शिरा खाऊन टाकतात, त्या शिवशक्तीला मी नमस्कार करितो.

**चौसष्टी * - वृत्ति आणि ज्ञान । हे शब्द मात्र भिन्न ।**
**एरवी अवघे एकपण । त्या हरिते नमन सद्भावें ॥४२॥**

अर्थ - वृत्तिरूप शक्ति व ज्ञानरूप शिव हे नुसते शब्दमात्र भिन्न आहेत. वास्तविक पाहता, वृत्ति व ज्ञान किंवा शक्ति व शिव एकच वस्तु आहे. असा शिवशक्तीच्या किंवा नामरूपांच्या तादात्म्याने सगुण भासणाऱ्या श्रीहरीला मी भक्तिभावाने नमस्कार करितो.

जयाच्या रूपनिर्धारीं । गेली परेसी वैखरी ।
सिंधुसी प्रळयनिरीं । गंगा जैसी ॥४६॥

अर्थ - ज्यांच्या स्वरूपाचा निर्धार करू पाहता शब्दच उरत नाही किंवा शब्दाचाच ठिकाणा राहत नाही. प्रळयामध्ये सर्व जलमय झाल्यावर जसे सिधु व गंगा यांना अलग निवडता येत नाही, त्याप्रमाणे हे शिवाचे रूप व हे शक्तीचे रूप असे सांगणारा शब्दच उरत नाही.

**चौसष्टी * - निश्चय करितां कांहीं । तरी शब्दासी ठाव नाही ।**
**समुद्रासहित नदी ही । प्रलयपाण्यांत मिळे जैसी ॥४३॥**

अर्थ - त्यांचा स्वरूपनिश्चय करूं म्हटल्यास शब्दच मावळतो. ज्याप्रमाणे प्रलयात गंगा व सिंधु यांना अलग निवडता येत नाही त्याप्रमाणे शिवशक्तींच्या अद्वैतातून किंवा एकरूपतेतून त्यांच्या स्वरूपाचा निश्चय करून त्यांना अलग दाखविता येत नाही.

वायु चळवळेसीं । जिराला व्योमाचिये कुशीं ।
आटला प्रलयप्रकाशीं । सप्रभ भानु ॥४७॥

अर्थ - ज्याप्रमाणे वायु आपल्या वाहतेपणासह आकाशात मिळून जातो किंवा प्रलयाच्या तेजात जसा प्रकाशासह सूर्य लोपून जातो.

## A



**चौसष्टी * - वायु आकाशांत गेला सकळ । की प्रलयाग्नींत नसे सूर्यमंडळ ।**
**तैसे सोज्वळ । जाणावे गुरुमुखें ॥४४॥**

अर्थ - ज्याप्रमाणे वायु आपल्या हालचालीसह संपूर्ण आकाशात नाहिसा होतो किंवा प्रलयाग्नीत सूर्यमंडळ एक होऊन जाते, त्याप्रमाणे शिवशक्तीचे शुद्ध अद्वैतत्व गुरुमुखाने जाणले पाहिजे.

जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनी गेली दोन्ही ।
आवघियाचि रजनी । दिठी जेवी ॥४८॥

अर्थ - शिवशक्तींच्या आलिंगनात त्यांचे दोनपण अत्यंतच नाहिसे होते. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशात अंधार व उजेड हा भेद राहत नाही एक प्रकाशच राहतो, त्याप्रमाणे शिवशक्तीच्या आलिंगनात एक आनंदच राहतो.

**चौसष्टी * - दोन्हीच्या भेटी । नाहीं दोनपणाची गोठी ।**
**परि एकपण उठाउठी । भक्तीनें गौण ॥४५॥**

अर्थ - शिवशक्तीच्या भेटीमध्ये दोनपणा नसतो आणि एकपणा असला तरी तोहि प्रेमभक्तीने गौण होतो.

तेवि न्याहाळता ययाते । गेले पाहणेनसी पाहाते ।
पुढती घरौते वरौते । वंदिली तिये ॥४९॥

अर्थ - तसे शिवशक्तीला पहायला गेले असता, पाहणारा पाहण्यासह नाहिसा होतो. अशा या शिवशक्तीला पुनः मी नमस्कार केला.

**चौसष्टी * - वरी वृत्ति असली जरी । विषय-विषयी भाव नाहीं तरी ।**
**उलट ज्ञानवृत्ति दोही परी । भक्तींत हारविती संत ॥४६॥**

अर्थ - येथे जरी अद्वैतवृत्ति राहत असली तरी विषय म्हणजे पाहिली जाणारी वस्तु व विषयी म्हणजे पाहणारा असा द्वैतभाव राहत नाही. उलट ज्ञानवृत्तीचा अद्वैतभावहि, ज्ञानवृत्तितादात्म्यरूप सगुण श्रीहरीची भक्ति करून महात्मे नाहिसा करतात.

जयाचिया वाहणीं । वेदकु वेद्याचे पाणी ।
न पिये सांडणी । आंगाचीहि करी ॥५०॥

## B

अर्थ - शिवशक्ति यांच्या प्रवाहात म्हणजे प्रेमाने विषयीविषयरूप होण्यात, शिव हा विषयी, शक्तिरूप विषयाचे पाणी देखील पीत नाही. एवढेच नाही, तर आपल्या आंगाचीहि सांडणी करितो.

तेथ मी नमस्कारा । लागी उरो दुसरा ।
तरी लिंगभेद पऱ्हा । जोडूं जावो ॥५१॥

अर्थ - शिवशक्तींच्या अत्यंत ऐक्य स्थितीत त्यांना नमस्कार करण्याकरिता मी निराळा कसा राहीन? कारण नमस्कार करण्याकरिता अलग राहणे म्हणजे दुसरी कडून त्यांच्याशी भेद जोडणेच होय.

**चौसष्टी * - तेथ नमस्कार म्यां केला । तो एकत्वेचि झाला ।**
**दुसरा नाहीं आला । लाक्षणिकही ॥४७॥**

अर्थ - शिवशक्तीला मी नमस्कार केला तो अद्वैतपणेच केला कारण शिवशक्तींच्या ऐक्यांत औपचारिकरीत्या देखील दुसरेपण मानता येत नाही.

परी सोनेनसी दुजे । न होता लेणें सोना भजे ।
ते नमन करणें माझे । तैसे आहे ॥५२॥

अर्थ - सोन्याहून निराळा न होता जसा अलंकार सोन्याला भजतो म्हणजे सोन्याचा होऊन राहतो, तसे माझे हे नमन आहे.

**चौसष्टी * - अलंकार आणि सुवर्ण । न होता भिन्न । परी शोभे अलंकारपण ।**
**सोन्याचि वरी ॥४८॥ तैसे म्या नमस्कारिता । प्रेमचि शोभा तत्वता**
**। पतिपत्नीभाव भक्ता । एकत्वे आला ॥४९॥**

अर्थ - सोने व सोन्याचा अलंकार भिन्न न होता जसा अलंकार राहतो व तो सोन्याला शोभा किंवा सौंदर्य आणतो, त्याप्रमाणे मी एकरूप शिवशक्तीला नमस्कार केला असता त्या नमस्कारातील प्रेमभाव, शिवशक्तीची शोभा होते. **अद्वैतानंतर शिवशक्तीरूप अशा शिवाचे, शक्तिप्रमाणे अभेदरूपाने स्वाभाविक प्रेम करणे यालाच पतिपत्नीभक्ति म्हणतात. हा पतिपत्नीभक्तिभाव भक्ताला सहज प्राप्त होतो.** म्हणजे तो शक्तीशी मिळून शिवाशी स्वाभाविक प्रेमाने मिळतो. केवळ शक्तिरूप

A

होऊन राहणे हेच शिवात मिळणे होय.

सांधिता वाचेते वाचा । ठावु वाच्यवाचकाचा ।
पडता काय भेदाचा । विटाळु होय ॥५३॥

अर्थ - वाणीला वाचा हा शब्द लावला असता म्हणजे वाणीने वाणी शब्द उच्चारला असता, वाच्यवाचकभाव उमटतो हे खरे,पण येथे दोन निराळया वस्तूंचा संबंध झाला काय?

सिंधु आणि गंगेच्या मिळणी । स्त्री पुरुष नामाची मिरवणी ।
दिसतसे तरी काय पाणी । द्वैत होईल ॥५४॥

अर्थ - समुद्रास गंगा मिळाली असता नुसते स्त्रीलिंगी व पुरुषलिंगी शब्दांचेच मिरवणे झाले. बाकी पाणी काही भिन्न झाले नाही.

**चौसष्टी * - समुद्र आणि नदी । एक मिळे हे प्रसिद्धी ।**
**परी पाणीपणाची बुद्धी । दुसरी नाही ॥५०॥**

अर्थ -समुद्र व नदी एकरूप मिळतात हे आपण सर्वजण पाहतो पण तेथे एक पाणीबुद्धिच राहते, दुसरी बुद्धि राहत नाही.

पाहे पा भास्य भासकता । आपला ठायीं दाविता ।
एकपण काय सविता । मोडतसे ॥५५॥

अर्थ - सूर्य प्रकाशला असता तोच त्याच्या प्रकाशाने दिसतो. तोच प्रकाशक व तोच प्रकाश्य होतो. पण सूर्याचे एकपण नाहिसे होते काय ?

चांदाचिया दोंदावरी । होत चांदणियाची विखुरी ।
काय उणे दीप्तीवरी । गिवसो पां दिपु ॥५६॥

अर्थ - चंद्राचे तेज चंद्राच्याच पोटावर फांकते, त्यायोगे चंद्र अधिक दोंदिल (मोठ्या पोटाचा) दिसतो म्हणजे फांकलेल्या तेजाने चंद्र अधिक शोभिवंत दिसतो त्याप्रमाणे दिव्याचे तेज त्याला सोडून राहत नाही व त्याने दिवा कमी होत नाही.

**चौसष्टी * - कां चंद्राचाचि प्रकाश । जितुका फांकेल भरोनि आकाश ।**
**तितुके चंद्रपणास । भूषणचि कीं ॥५१॥**

B

**कां दिव्याची दीप्ति । उणी न करे दिव्याप्रति ।**
**आणि दिव्यास सोडोनि दीप्ति । राहताचि नये ॥५२॥**

अर्थ - चंद्राचा प्रकाश जितका फाकेल तितका त्यायोगे चंद्रच शोभिवंत दिसतो. ५१. दिव्याचे तेज दिव्याला कमी करीत नाही व दिव्याला सोडून दिव्याचे तेज राहूच शकत नाही. ५२.

मोतियाची कीळ । होय मोतियावरी पांगुळ ।
आगळे निर्मळ । रूपा ये कीं ॥५७॥

अर्थ - मोत्याचे तेज मोत्याचे ठिकाणी अचल असेल तर, ते मोत्ये अधिक सुंदर व बहुमोलाचे ठरते.

**चौसष्टी * - मोत्याचे सुंदरपण । जितुके निघेल परीक्षून ।**
**तितुके मोल पूर्ण । अधिक तया ॥५३॥**

अर्थ - मोत्याचे पाणी जितके तेजस्वी व टिकाऊ, परीक्षेने ठरेल तितके त्या मोत्याचे मोल अधिक होईल.

मात्राचिया त्रिपुटिया । प्रणव काय केला चिरटिया ।
कीं ण-कार ति-रेघटिया । भेदावला काई ॥५८॥

अर्थ - प्रणवाच्या अ उ म अशा तीन मात्रांनी, तीन तुकडे केले म्हणून त्यात भेद झाला काय किंवा णकार हा तीन रेषांनी दाखविला म्हणून त्याच्यात भेद झाला काय?

**चौसष्टी * - अकार उकार मकार । मिळोनि एकचि ॐकार ।**
**की तीन रेषा परी 'ण' कार । एकचि असे ॥५४॥**

अर्थ - अकार, उकार, व मकार हे तीन मिळून ॐकार एकच घेतला जातो किंवा ण काराच्या तीन रेषा असल्या तरी, ण कार एकच आपण घेतो.

अहो ऐक्याचे मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभु मिळे ।
तरी स्वतरंगाची मुकुळे । तुरंबुं कां पाणी ॥५९॥

अर्थ - अद्वैताचे मुद्दल कमी न होता जर दोनपणाच्या भासाने सौंदर्याचा लाभ होतो

## A

तर पाणी आपल्या तरंगरूपी कळ्यांचा सुखाने सुगंध घेवो ना कां ।

**चौसष्टी * - तैसे चिदेकपण नाही मोडले । आणि भक्तींत विशेष प्रेम जोडले ।**
**तरी तरंग समुद्र झाले । गोड पाण्याचे ॥५५॥**

अर्थ - चिदैक्य न मोडता जर भक्तीत विशेष प्रेमसुखाचा लाभ आहे तर अद्वैतानंतर भक्ति करणे म्हणजे तरंगाने गोड पाण्याचा समुद्र होणे होय.

म्हणोनि भूतेशु आणि भवानी । न करूनि सिनानी ।
मी रिघालो नमनीं । ते हे ऐसे ॥६०॥

अर्थ - म्हणून शिवशक्तींला निराळे न मानता मी त्यांना जो नमस्कार करितो तो याप्रमाणे.

**चौसष्टी * - तैसे एक करोनि ज्ञानवृत्ति । साधूनिया हरिप्रीति ।**
**नमन करावयाची रीति । तेहि ऐका ॥५६॥**

अर्थ - त्याप्रमाणे ज्ञानवृत्तींचे ऐक्य करून व त्या ज्ञानवृत्तींच्या तादात्म्याने सगुण साकार झालेल्या श्रीहरीची प्रेमभक्ति साधून जे श्रीहरीला नमन करायचे ते येणे प्रमाणे आहे.

कां दर्पणाचेनि त्यागे । प्रतिबिंब बिंबीं रिघे ।
कां बुडी दिजे तरंगे । वायूचा ठेला ॥६१॥

अर्थ - आरसा बाजूला सारला असता ज्याप्रमाणे प्रतिबिंब बिंबात मिळून जाते किंवा वायु शांत झाल्याबरोबर तरंग पाण्यांत बुडी मारतो.

**चौसष्टी * - वायु राहतां तरंग नुठे । तैसे सगुणपणी दोनपण नुठे ।**
**मग हे गोमटे । सांवळे रूप ॥५०॥**

अर्थ - वायूचे वाहणे थांबले असता तरंग उठत नाही, तसेच सगुण श्रीहरीच्या प्रेमात दोनपण उठत नाही, असे सुंदर श्रीहरीचे सगुण सावळे रूपच एक तेथे राहते.

नातरी निद जात खेवो । पावे आपुला ठावो ।
तैसी बुद्धित्यागे देवी देवो । वंदिली मिया ॥६२॥

## B

अर्थ - निद्रा संपल्याबरोबर आपण आपल्या ठिकाणी जसे राहतो, त्याप्रमाणे बुद्धीचा त्याग करून मी देवोदेवीना वंदन केले.

**चौसष्टी * - निद्रेमाजीं जैसी कांही । आपुली आठवणचि नाही ।**
**आणि 'नाहीं' हेहि । म्हणतां नये ॥५८॥**
**तैसी बुद्धि संकेतीं गेली । कृष्ण आणि प्रीति एक झाली ।**
**मग ध्येयत्वें जे कां बाह्यांतर प्रगटली ।**
**ते मूर्ति बंदिली कृपामय ॥५९॥**

अर्थ - झोपेत आपल्याला आपली आठवण राहत नाही व आठवण नाही हेहि आपण जाणत नाही ५८. त्याप्रमाणे अद्वैत ज्ञानदृष्टींत बुद्धि हीहि अलग राहत नाही. मग साकार श्रीकृष्णमूर्ति व प्रेमवृत्ति यांचे ऐक्य होऊन जाते व प्रेमामुळे त्या मूर्तीचेच ध्यान लागल्याने ती श्रीकृष्णमूर्तिच बाहेर व आंत भासू लागते. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात अशा त्या कृपासंपन्न मूर्तीला मी वंदन केले. ५९

सांडुनि मीठपणाचा लोभु । मिठे सिंधुत्वाचा घेतला लाभु ।
तेवि अहं देऊनि शंभु । शांभवी झालो ॥६३॥

अर्थ - ज्याप्रमाणे मीठाने खडेपणाचा अभिमान सोडून सिंधुत्वाचा लाभ करून घ्यावा; त्याप्रमाणे शंभूला मीपणा देऊन मी शांभवी शक्ति झालो.

**चौसष्टी * - कठीणपणा सांडोनि लवण । स्वये समुद्र झाले आपण ।**
**तैसे तोडोनि ज्ञानाहंपण । झाले अर्पण हरिपायीं ॥६०॥**
**हरि आणि प्रीति एक । ज्ञानवृत्ति आणि सुख ।**
**संकेतासहित सम्यक् । कृष्णचि हा ॥६१॥**

अर्थ - मिठाचा खडा आपले कठीणपण सोडून समुद्रांत लीन होऊन जातो, त्याप्रमाणे मीहि ज्ञानाहंकार सोडून श्रीहरीपायी समर्पण झालो.॥६०॥ श्रीहरी व प्रीति एकच आहे. ज्ञानवृत्ति व सुख एकच असून ज्ञानदृष्टीसह सर्वच भगवान् आहे.

शिवशक्ति समावेशे । नमन केले म्यां ऐसे ।

रंभागर्भ आकाशे । रिघाला जैसा ॥६४॥

अर्थ - ज्याप्रमाणे केळीपासून झालेला कापूर जाळला असता निःशेष नाहिसा होऊन आकाशांत मिळून जातो त्याप्रमाणे मीपणा सोडून व शिवशक्तींचे ऐक्य करून मी नमन केले.

**चौसष्टी * - कापूर आकाशी विरे । परी वास जैसा उरे ।**
**तैसा संकेतहि अर्पितां खरें । प्रेमे बरें उरले हरिदास्य ॥६२॥**
**ही अद्वैत प्रेमखूण । जेणें संतोषले पति कृष्ण ।**
**याचि जळे ज्ञानेश्वरताताचरण । अभिषेकिले ॥६३॥**
**दयाळे ज्ञानेश्वर जननी । सद्‌गुरु सखे माय बहिणी । हे ममसहित**
**अर्पिले तव चरणी । आता दासी करूनि दुग्ध पाजी ॥६४॥**

अर्थ - ज्याप्रमाणे कापूर आकशांत एकरूप होऊन जातो पण त्याचा सुगंध उरतो त्याप्रमाणे ज्ञानदृष्टिहि समर्पण केली असता, एक निष्काम प्रेमाने भगवंताची सेवाच उरते. ६२. ही अद्वैत भक्तीची खूण आहे. या निष्काम अद्वैतभक्तीने श्रीकृष्ण भगवान् संतुष्ट झाले. त्याच अद्वैत प्रेमभक्तिरूपी जलाने तात श्रींज्ञानेश्वरमहाराज यांचेहि चरणाला अभिषेक केला. ६३. सखे दयाळे ज्ञानेश्वर जननी माय बहिणी, हे सर्व आपल्यासह मी तुझे चरणी समर्पण केले आहे. आतां आपली दासी करून स्तनपान करीन व हीच पायापाशी मागणी आहे. ६४.

॥ पांडुरंग चौसष्टी समाप्त ॥